<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३०/२०२३ मधील निशाणी क्रमांक २२ वर आदेश</u>
(सीएनआर : एमएचआरजी०६—०००११०—२०२३)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी सदरचा दावा त्यांचे विरूद्ध एकतर्फा चालविण्याचा झालेला आदेश रद्द करून कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ यांनी असे नमुद केले आहे की, त्यांना दाव्याचे समन्स २२/०२/२०२३ रोजी मिळाले होते. परंतु, त्या अशिक्षीत असल्याने त्यांना याबाबतची जास्त माहीती नव्हती व त्यांचे घरात कार्यक्रम असल्याने सदर बाबीचा त्यांना विसर पडल्याने त्या सदरील प्रकरणात उपस्थित राहू शकल्या नाहीत. उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ यांनी सदरचा दावा त्यांचे विरूद्ध एकतर्फा चालवण्याचा झालेला आदेश रद्द करून कैफियत अभिलेखावर घ ेण्यासाठी योग्य कारण दर्शविल्याने सदरचा अर्ज मान्य करण्याची विनंती उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ यांनी केली.

३. अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करून अर्जास विरोध केला आहे.

४. अर्ज व त्यावरील वादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

५. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ यांना सदर प्रकरणाचे समन्स प्राप्त होवूनही उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ सदर प्रकरणात हजर झाले नाहीत. मात्र या गोष्टीचाही विचार करणे गरजेचे आहे की, उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ने त्यांच्या विरूदध दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करण्यासाठी व कैफियत अभिलेखावर घेण्यास संयुक्तिक कारण दर्शविले आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे :

<u>आदेश</u>

१) सदरचा अर्ज (निशाणी क्र. २२) खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२) उपरोक्त प्रतिवादी क्र. ४ यांनी वादी यांस रक्कम रुपये २००/– (अक्षरी रक्कम रुपये दोनशे मात्र) एवढा खर्च दिल्यानंतर यांचे विरूद्ध झालेला दावा एकतर्फा चालवण्याचा आदेश रद्द करण्यात यावा व कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

दि. २७.०३.२०२३
स्थळ: पेण

(प्रितेश देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पेण